# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

Office of the Collector and District Magistrate, Mumbai City

ओल्ड कस्टम हाउस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 400 001

Old Custom House, Shahid Bhagatsing Marg, Mumbai 400 001

Fax : 22664232 Tel. 22661231 Ext.205 Email : collector_mumbaicity@maharashtra.gov.in


क्रमांक – रवका/टे–3/केंशामाअअ–05/शामअ/2006 /665

दिनांक – 23 जानेवारी, 2006

**विषय** – केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005

**संदर्भ** – 1. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.कैमाअ–2005/ प्र.क्र.190/05/5, दिनांक 18/6/2005

2. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.कैमाअ–2005/ प्र.क्र.190/05/5, दिनांक 6/8/2005

3. जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे आदेश क्र.रवका/टे–3/ केंशामाअअ–05/सशामअ/05, दिनांक 11/10/2005

**आ दे श**

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 5 (1) नुसार जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालयासाठी संदर्भ क्र.3 अन्वये ''शासकीय माहिती अधिकारी '', ''अपिलीय प्राधिकारी '' आणि ''सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी '' पदनिर्देशित करण्यात आले आहेत.

2. उपरोक्त अधिनियमातील कलम 5 (1 ) अन्वये जनतेला माहिती देण्याकरिता जिल्हाधिकारी मुंबई शहर कार्यालयाकरिता संदर्भातील क्र. 3 नुसार अ.क्र. 4 वर श्रीमती आर.आर.सावळे, वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांना मुंबई शहर जिल्ह्यातील भूसंपादन अधिनियम 1894 अंतर्गत येणारी सर्व प्रकरणे आणि म्हाडा अधिनियम 1976 नुसार म्हाडाचे भूसंपादन व त्याअनुषंगाने इतर माहिती आणि त्यांच्याकडे सोपविलेल्या इतर विषयाची माहिती जनतेला उपलब्ध करुन देण्याकरिता ''शासकीय माहिती अधिकारी'' म्हणून पद निर्देशित करण्यात आलेले आहे.

3. ज्याअर्थी श्रीमती आर.आर.सावळे, वरिष्ठ लिपीक यांची बदली झाल्यामुळे त्यांना दि.31/12/2005 च्या आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात आले आहे. वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई या पदाचा कार्यभार श्री.जे.एस.कुसनूर यांनी दि. 10/1/2006 पासून स्विकारला आहे.. त्याअर्थी श्री. जे.एस.कुसनूर, वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई, 3 ला माळा, जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, ओल्ड कस्टम हाउस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – 400 001, दू.क्र. 22661231 विस्तारीत 405 यांना मुंबई शहर जिल्ह्यातील भूसंपादन अधिनियम 1894 अंतर्गत येणारी सर्व प्रकरणे आणि म्हाडा अधिनियम 1976 नुसार म्हाडाचे भूसंपादन व त्याअनुषंगाने इतर माहिती आणि त्यांच्याकडे सोपविलेल्या इतर विषयाची माहिती जनतेला उपलब्ध करुन देण्याकरिता या

आदेशान्वये उपरोक्त अधिनियमातील कलम 5 (1 ) अन्वये ''शासकीय माहिती अधिकारी'' म्हणून दि. 10/1/2006 पासून पद निर्देशित करण्यात येत आहे.

4. श्रीमती आर.आर.सावळे, तत्कालीन वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई यांना दिनांक 11/10/2005 अन्वये शासकीय माहिती अधिकारी म्हणून पद निर्देशित केलेले आदेश दिनांक 1/1/2006 पासून निरसित करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी मुंबई शहर

प्रति,

1. जिल्हाधिकारी, मुंबई शहर
2. उपजिल्हाधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, मुंबई शहर
3. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, एन.आय.सी.,मुंबई शहर
4. प्रमुख लिपिक व प्रमुख लेखापाल, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर
5. श्री.जे.एस.कुसनुर, वरिष्ठ लिपीक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई
6. श्रीमती आर.आर.सावळे, वरिष्ठ लिपीक, करमणूक कर विभाग, मुंबई

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

1. मा.प्रधान सचिव (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई – 400 032
2. मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई – 400 614
3. मा.सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई – 400 032